# कोनगाव वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २५४ /२०२४ दि. २२/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोनगाव वाहतुक उप विभागाचे हद्दीत १३७ भिवंडी पुर्व विधानसभा सार्वत्रिक निवडणुक–२०२४ चे मतमोजणी अनुषंगाने दि २३/११/२०२४ रोजी मतमोजणी केंद्र परीसरात मोठया प्रमाणात विविध राजकिय पक्षांचे कार्यकर्ते, व अती महत्वाच्या व्यक्ती येण्याची शक्यता आहे. त्यामुळे भादवड नाका ते संपदा हॉल रोडवर सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. तरी सदर परिसरात वाहतुक कोंडी होवू नये व परीसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) भादवड नाका येथून भादवडगाव तसेच सोनाळे गावात जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड व हलक्या वाहनांना ' **प्रवेश बंद** ' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने टेमघर पाडा येथून वळण घेवून फक्त हलकी वाहने भादवड गावात जातील. तसेच जड अवजड वाहने रांजनोलीनाका मार्गे डावीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) सोनाळे गाव येथुन भादवडनाका भिवंडी कडे येणाऱ्या मार्गावर सर्व प्रकारच्या (जड, अवजड, हलकी वाहने, कार, रिक्षा, दुचाकी) वाहनांना ' **प्रवेश बंद** ' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने सोनाळे फाटा येथून उजवीकडे वळण घेवुन राजनोली नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) रांजनोलीनाका येथे भिवंडी शहरात जाणाऱ्या मार्गावर सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना ' **प्रवेश बंद** ' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | अ)सदर वाहने मानकोलीनाका येथे उजवीकडे वळण घेवुन अंजुरफाटा मार्गे वळण घेवून इच्छित स्थळी जातील. |
| | ब)सदर वाहने वडपा येथे डावीकडे वळण घेवुन चाविंद्रा मार्गे वळण घेवून इच्छित स्थळी जातील. |

सदर वाहतूक अधिसूचना दि. २३/११/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १,२,३.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/भिवंडी/कल्याण डोंबिवली.

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

संबंधित सपोआ, वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner